
ePaper
| वर्ष - 8 | अंक -79 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 26 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मुंबईच्या अंधेरीत उघड्या नाल्यात पडून 45 वर्षीय महिलेचा मृत्यू



## आतील पानांत


- तिने देशाची माफी मागायला हवी!
- खराब कामगिरीचा विराला मोठा फटका
- काँग्रेसच्या डीएनएमध्येच आरक्षणविरोध
- इदगाह प्रकरणी पुन्हा तारीख



## मोदी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रोतून प्रवास करणार

# PM मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर!

## पुणे मेट्रोसह 'या' 12 प्रकल्पांचे होणार लोकार्पण, कसा असेल दौरा?

**पुणे । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रो सेवेचे उद्घाटन आज, गुरुवारी (२६ सप्टेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या वेळी सोलापूर विमानतळ, सी-डॅकने तयार केलेले तीन सुपरकम्प्युटर, बिडकीन इंडस्ट्रियल प्रकल्प, स्वारगेट-कात्रज भुयारी मार्गाचे भूमिपूजन अशा १२ प्रकल्पांचे उद्घाटन-भूमिपूजन केले जाणार आहे. पंतप्रधान जिल्हा न्यायालय येथील इंटरचेंज मेट्रो स्थानकात सायंकाळी सहाच्या सुमारास येतील. जिल्हा न्यायालय येथून स्वारगेटला जाणाऱ्या मेट्रोला हिरवा झेंडा दाखवून मेट्रोसेवेचे उद्घाटन करतील. पंतप्रधान मोदी हे जिल्हा न्यायालय ते स्वारगेट असा मेट्रोतून प्रवास करणार आहेत. त्यानंतर स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर सर्व प्रकल्पाच्या लोकार्पणच्या कार्यक्रमाला मोदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पाचे पंतप्रधान यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे, अशी माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी दिली.



पंतप्रधान जिल्हा न्यायालय येथील इंटरचेंज मेट्रो स्थानकात सायंकाळी सहाच्या सुमारास येतील. जिल्हा न्यायालय येथून स्वारगेटला जाणाऱ्या मेट्रोला हिरवा झेंडा दाखवून मेट्रोसेवेचे उद्घाटन करतील. हे जिल्हा न्यायालय ते स्वारगेट असा मेट्रोतून प्रवास करणार आहेत.

### सोलापूर विमानतळाचे उद्घाटन

सोलापूर विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. ६५ कोटी रुपये खर्च करून नवीन विमानतळ उभारण्यात आले आहे. या विमानतळाची टर्मिनल इमारत ११५२ चौरस मीटर असून, या विमानतळाची वार्षिक क्षमता चार लाख आहे. या विमानतळासाठी १०० कार पार्किंगची सोय करण्यात आली आहे. या विमानतळामुळे परिसरातील विकासाला चालना मिळेल, अशी माहिती पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी दिली.

### पहिला टप्पा पूर्ण होणार

मेट्रोच्या पहिल्या टप्प्यात ३३.२८ किलोमीटर लांबीचा मेट्रो मार्ग तयार करण्याचे नियोजन होते. त्यापैकी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट हा ३.६२ किलोमीटर भुयारी मार्ग गुरुवारी प्रवाशांसाठी खुला होणार आहे. या मार्गावरील सर्व स्टेशन सुरू होणार आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यात मंजूर झालेले मेट्रो मार्गाचा टप्पा पूर्ण होणार आहे. खडकी आणि रेंजहिल्स अशी दोन स्थानके लवकरच सुरू केली जातील, असे हर्डीकर यांनी सांगितले.

### इतर प्रकल्प

भिडे वाडा स्मारक भूमिपूजन
स्वारगेट-कात्रज भुयारी मेट्रो मार्गाचे भूमिपूजन
पेट्रोलियम मंत्रालयाची ८६७१ कोटी रुपयांची कामे
सी-डॅकने तयार केलेल्या तीन सुपर कम्प्युटरचे उद्घाटन
भूविज्ञान मंत्रालयाच्या हायपरफॉर्मन्स कम्प्युटिंग प्रणालीचे उद्घाटन
छत्रपती संभाजीनगरजवळील सात हजार ८५५ एकरावरील बिडकीन इंडस्ट्रियल प्रकल्पाचे उद्घाटन

## भोसरी विधानसभेत विजयासाठी महाविकास आघाडीची शक्ती एकवटली !

## 'मविआ'च्या एकजुटीने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली : एकनाथ पवार

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये गेल्या दहा वर्षात भ्रष्टाचार, मनमानी कारभार दहशत आणि एकाधिकारशाहीचा कारभार सुरू आहे. करदात्या नागरिकांच्या खिशातील पैसा जागोजागी ओरबडला जात असून, नागरिक पाणी, वीज, रस्ते, खड्डे या प्रश्नांनी वैतागलेले आहेत. या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी महाविकास आघाडीने



'परिवर्तन' करायचे ठरवले आहे. हे परिवर्तन करण्यासाठी महाविकास आघाडीची शक्ती एक दिलाने लढणार असून त्यासाठी आमच्यामध्ये एकजूट आहे. आमची ही एकजूट पाहून आता विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) राज्य संघटक एकनाथ पवार म्हणाले.

शिवसेना राज्य संघटक तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेचे एकनाथ पवार यांच्या निवासस्थानी भोसरी विधानसभा महाविकास आघाडीची बैठक संपन्न झाली. यावेळी पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अजित गव्हाणे, शिवसेना पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेवक रवी लांडगे, माजी नगरसेवक आणि भोसरी विधानसभा प्रमुख धनंजय आल्हाट आदी उपस्थित होते. यावेळी एकनाथ पवार म्हणाले महाराष्ट्राच्या विधानसभेचे बिगुल वाजण्यासाठी अवघ्या काही दिवसांचा अवधी शिल्लक आहे. त्यामुळे राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे.

> भोसरी मतदारसंघांमध्ये गेल्या दहा वर्षात कोट्यावधी रुपयांचा निधी महापालिकेने दिला. मात्र त्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे झाला नाही. हे या मतदारसंघांमध्ये फिरल्यानंतर नक्कीच दिसून येते. नुकत्याच झालेल्या पावसाळ्यात रस्त्यांची दुरावस्था दिसून आली. संपूर्ण मतदारसंघ खड्डेमय झाला. यातूनच झालेल्या कामाची गुणवत्ता आणि त्यावर खर्च करण्यात आलेला पैसा यातील तफावत दिसून येते. नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. सोसायट्यांमध्ये पाण्याचा खूप मोठा प्रश्न आहे. या सर्व प्रश्नांवर 'परिवर्तन' हे एकच उत्तर आहे.
>
> **–अजित गव्हाणे,** माजी अध्यक्ष, स्थायी समिती पिंपरी चिंचवड महापालिका

# ‘आरटीओ’तील संपात मध्यस्थ तेजीत!

## नागरिकांकडून जादा पैशांची लूट सुरू; अधिकारी बघ्याच्या भूमिकेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी पुकारलेला बेमुदत संप सुरूच आहे. या संपात पुण्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) बहुतांश कर्मचारी सहभागी झाल्याने कामकाज ठप्प झाले आहे. याचा फायदा मध्यस्थांनी घेतला असून, नागरिकांकडून जादा पैसे उकळण्याचे काम ते राजरोसपणे करीत आहेत.**




पुण्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील सुमारे ७५ कर्मचारी २४ सप्टेंबरपासून संपावर आहेत. या संपामुळे नवीन वाहन परवाना वितरण, वाणिज्य वाहनांची नोंदणी, वाहन परवाना नूतनीकरण, वाहन परवान्यावरील पत्ता बदलणे, वाहनाची मालकी हस्तांतरित करणे, वाहनावरील कर्जाचा बोजा उतरविणे यासह अनेक सेवा बंद आहेत. हा संप आरटीओतील मध्यस्थांच्या पथ्यावर पडल्याचे चित्र सध्या दिसत आहे. अनेक मध्यस्थ आरटीओमध्ये आलेल्या नागरिकांकडून जादा पैसे उकळून त्यांची कामे संपाच्या काळातही करून देण्याचे आश्वासन देत आहेत. त्यामुळे शासकीय कामकाज बंद असताना मध्यस्थांसाठी खास मार्गाने ते सुरू असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. पुणे आरटीओ कार्यालयातील सेवांसाठी दररोज सुमारे १ हजार ते १ हजार २०० नागरिक अर्ज करतात. या संपामुळे या नागरिकांची आरटीओतील काम खोळंबली आहेत. काही नागरिकांना तातडीने कामे पूर्ण करण्याची निकड असते. असे नागरिक आरटीओ कार्यालयात येत आहेत. कार्यालयात मदत कक्ष आहे मात्र, तिथे अनेक वेळा कर्मचारीच उपस्थित नसतो. कार्यालयात आलेल्या नागरिकांना हेरून मध्यस्थ त्यांचे काम करून देण्याचे आश्वासन देत आहेत. त्यासाठी नागरिकांकडून अव्वाच्या सव्वा रक्कम ते घेत आहेत. याकडे आरटीओतील वरिष्ठ अधिकारी केवळ बघ्याच्या भूमिकेतून पाहत आहेत.मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागणीवर अद्याप राज्य सरकारने निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे आमचा संप कायम आहे. पुण्यातील आरटीओ कार्यालयात दररोज सुमारे बाराशेहून अधिक नागरिकांच्या अर्जावर कार्यवाही केली जाते. सध्या हे काम ठप्प झाले आहेअनेक मध्यस्थ आरटीओमध्ये आलेल्या नागरिकांकडून जादा पैसे उकळून त्यांची कामे संपाच्या काळातही करून देण्याचे आश्वासन देत आहेत. त्यामुळे शासकीय कामकाज बंद असताना मध्यस्थांसाठी खास मार्गाने ते सुरू असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. पुणे आरटीओ कार्यालयातील सेवांसाठी दररोज सुमारे १ हजार ते १ हजार २०० नागरिक अर्ज करतात. या संपामुळे या नागरिकांची आरटीओतील काम खोळंबली आहेत. काही नागरिकांना तातडीने कामे पूर्ण करण्याची निकड असते. असे नागरिक आरटीओ कार्यालयात येत आहेत. कार्यालयात मदत कक्ष आहे मात्र, तिथे अनेक वेळा कर्मचारीच उपस्थित नसतो. कार्यालयात आलेल्या नागरिकांना हेरून मध्यस्थ त्यांचे काम करून देण्याचे आश्वासन देत आहेत. त्यासाठी नागरिकांकडून अव्वाच्या सव्वा रक्कम ते घेत आहेत. याकडे आरटीओतील वरिष्ठ अधिकारी केवळ बघ्याच्या भूमिकेतून पाहत आहेत.मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागणीवर अद्याप राज्य सरकारने निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे आमचा संप कायम आहे. पुण्यातील आरटीओ कार्यालयात दररोज सुमारे बाराशेहून अधिक नागरिकांच्या अर्जावर कार्यवाही केली जाते. सध्या हे काम ठप्प झाले आहे

### दररोज 1 हजार नागरिक अर्ज करतात

वाणिज्य वाहनांची नोंदणी, वाहन परवाना नूतनीकरण, वाहन परवान्यावरील पत्ता बदलणे, वाहनाची मालकी हस्तांतरित करणे, वाहनावरील कर्जाचा बोजा उतरविणे यासह अनेक सेवा बंद आहेत. हा संप आरटीओतील मध्यस्थांच्या पथ्यावर पडल्याचे चित्र सध्या दिसत आहे. अनेक मध्यस्थ आरटीओमध्ये आलेल्या नागरिकांकडून जादा पैसे उकळून त्यांची कामे संपाच्या काळातही करून देण्याचे आश्वासन देत आहेत. त्यामुळे शासकीय कामकाज बंद असताना मध्यस्थांसाठी खास मार्गाने ते सुरू असल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. पुणे आरटीओ कार्यालयातील सेवांसाठी दररोज सुमारे १ हजार ते १ हजार २०० नागरिक अर्ज करतात.

# पुणे पुढील २४ तासांसाठी पावसाचा रेड अलर्ट

## शाळा महाविद्यालयांना मुसळधार पावसामुळे सुट्टी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील एस.पी. कॉलेजच्या मैदानावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उद्या शिवाजीनगर न्यायालय ते मंडईपर्यंतच्या मेट्रोचे तसेच यासह जवळपास १५ प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले जाणार आहे.**

मात्र आज सकाळपासून शहरात जोरदार पावसाने हजेरी लावली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ज्या ठिकाणी कार्यक्रम होणार आहे त्या ठिकाणी देखील जोरदार पाऊस सुरू आहे. यामुळे प्रशासनाकडून मैदानांवर पाणी साचू नये, कार्यक्रम पार पाडला जावा यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.मात्र त्याच दरम्यान आता रायगड, रत्नागिरी, पालघर, नाशिक या चार जिल्ह्यामध्ये विजेच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर पुणे जिल्ह्यासाठी पुढील २४ तासांकरिता रेड अलर्ट देण्यात आला आहे. यामुळे उद्या पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमावर पावसाचे सावट असल्याचे स्पष्ट दिसत



आहे.भारतीय हवामानशास्त्र विभाग मुंबई यांनी वादळ व विजेच्या कळकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या अतिदक्षतेच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना म्हणून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील सर्व शाळा व महाविद्यालयांना गुरुवार 26 सप्टेंबर 2024 रोजी सुट्टी देण्यात आली असल्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.

पुणे शहर आणि जिल्ह्यात आज दिवसभर मुसळधार पावसाने झाल्याने अनेक ठिकाणी झाडपडी च्या घटना घडल्या आहेत.तर काही घरामध्ये पाणी जाण्याच्या घटना देखील घडल्या.तसेच या मुसळधार पावसामुळे शहरातील बहुतांश भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी पाहण्यास मिळाली.

### पुढील 24 तासांकरिता रेड अलर्ट

पुढील २४ तास विजेच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.तर यामध्ये पुणे जिल्ह्यासाठी पुढील २४ तासाकरिता ऑरेंज अलर्ट हवामान विभागा मार्फत देण्यात आला आहे. आजचा पाऊस आणि हवामान विभागा मार्फत उद्याचा देण्यात आलेला अंदाज लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनामार्फत पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन शहरातील शाळा, महाविद्यालय यांना सुट्टी घोषित केली आहे.26 सप्टेंबर 2024 रोजी सुट्टी देण्यात आली असल्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.पुणे शहर आणि जिल्ह्यात आज दिवसभर मुसळधार पावसाने झाल्याने अनेक ठिकाणी झाडपडी च्या घटना घडल्या आहेत.

## ‘पीएमआरडीए’च्या अर्थसंकल्पात

# भोसरी विधानसभेचा ‘डंका’

### औद्योगिक प्रदर्शन केंद्र, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला निधी

### महायुती सरकारची भाजपा आमदार महेश लांडगे यांना ‘ताकद’

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) च्या माध्यमातून पवना, इंद्रायणी आणि मुळा नद्या प्रदूषणमुक्त करण्यासाठी १ हजार ९६७ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना आणि आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्राच्या कामाला चालनादेण्यासाठी प्राधान्य दिले आहे. त्यामुळे पीएमआरडीएच्या अर्थसंकल्पामध्ये भोसरी विधानसभा मतदार संघाचा ‘डंका’ आहे.**




पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीएमआरडीएचा ३ हजार ८३८कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मंजूर केला. त्यामध्ये विविध प्रकल्पांना ‘बुस्टर’ दिला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे प्रतिनिधीत्व करत असलेल्या भोसरी मतदार संघातील आवास योजना, नदी सुधार प्रकल्प, आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्राच्या कामाला अर्थसंकल्पामध्ये झुकते माप दिले आहे. प्राधिकरण पेठ क्रमांक १२ येथे गृहप्रकल्प योजना अंतर्गत टप्पा क्रमांक १ मध्ये ४ हजार २८९ सदनिका निर्माण होत आहेत.

टप्पा- २ मधील ६ हजार ४५२ सदनिका प्रस्तावित आहेत. पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राची उभारणीला गती देण्यात आली असून, प्रदर्शन हॉलच्या कामाला पीपीपी तत्वावर विकसित करण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

यासह अग्निशमन केंद्र, प्रशासकीय इमारत, बस डेपो, मेट्रो स्टेशन आदी सुविधांसाठी सुमारे ९८२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

> “पिंपरी-चिंचवडमधील इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना आणि औद्योगिक प्रदर्शन केंद्रासाठी आम्ही सातत्याने आग्रही आहोत. नुकतेच पर्यावरण विभागाने नदी सुधार प्रकल्पासाठी मंजुरी दिली. त्यानंतर आता पीएमआरडीएच्या माध्यमातून संबंधित प्रकल्पाला निधी उपलब्ध करण्यात आला आहे. शहराच्या विकासामध्ये सदर प्रकल्प ‘माईलस्टोन’ राहतील, यात शंका नाही.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा

---

## निळ्या पूररेषेतील बांधकामांवर कारवाई स्थगिती, शंकर जगताप यांच्या प्रयत्नांना यश

### निळ्या पूररेषेत बांधकामे असणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा

। पिंपरी । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**सांगवीतील पवना नदीलगतच्या निळ्या पूररेषेअंतर्गत असलेल्या निवासी आणि व्यावसायिक बांधकामांवरील कारवाईस अखेर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह आज (मंगळवारी) स्थगिती दिली. भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विनंतीवरून झालेल्या या निर्णयामुळे लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**



दरवर्षी नदीला पूर आल्यानंतर नदीपात्रा लगतच्या भागात पुराचे पाणी शिरते. त्यामुळे तेथील रहिवाशांना स्थलांतरित करावे लागते. पुराचा धोका असल्यामुळे निळ्या पूररेषेतील बांधकामामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या वतीने अतिक्रमण कारवाई करण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतला होता. या पार्श्वभूमीवर भाजपच्या शिष्टमंडळाने शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली आज तातडीने महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर चर्चा करीत सदर कारवाई तातडीने स्थगित करण्याची विनंती केली.

### आयुक्तांना देण्यात आले निवेदन

बैठकीस माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, सुरेश भोईर, शारदाताई सोनावणे, राजू सावळे यांच्यासह सांगवी परिसरातील सर्व नागरिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांगवीसह पिंपळे गुरव, रहाटणी, पिंपरी, काळेवाडी, वाकड या परिसरातील निळ्या पूररेषेत असलेल्या लाखो नागरिकांना महापालिकेच्या या कारवाईचा फटका बसणार आहे. या सर्वसामान्य नागरिकांच्या घरावर कोणतीही कारवाई करू नये, अशी मागणी करणारे निवेदन आयुक्तांना देण्यात आले.

विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत आजच्या बैठकीनंतर महापालिका प्रशासनाने कारवाईला स्थगिती दिली असून त्यामुळे निळ्या पूररेषेत येणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

## चऱ्होलीतील आवास योजनेतील मालमत्ताधारकांना दिलासा

### चुकीच्या पद्धतीने लावलेला मालमत्ता कर अखेर रद्द

। पिंपरी । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

पंतप्रधान आवास योजना चऱ्होली या गृहप्रकल्पाला महानगरपालिकेकडून लावलेला चुकीचा मालमत्ता कर फेडरेशनच्या पाठपुराव्याने अखेर रद्द करण्यात आला आहे. चिखली-मोशी-चऱ्होली- पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून कर संकलन विभागाचे प्रशासन अधिकारी नाना मोरे यांच्याकडे पंतप्रधान आवास योजना चऱ्होली या गृहप्रकल्पाला बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्याच्या अगोदरपासून म्हणजे २०२२ पासून कर आकारणी करण्यात आली होती. याची तक्रार फेडरेशनकडे आल्यानंतर फेडरेशनच्या माध्यमातून कर संकलन विभागाचे प्रशासन अधिकारी नाना मोरे यांच्याबरोबर बैठक झाली आणि चुकीची कर आकारणी २०२२ ऐवजी बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्याच्या तारखेनंतर म्हणजे २०२३ पासून होईल, असे आश्वासन फेडरेशनच्या आणि पंतप्रधान आवास योजना चऱ्होली मधील नागरिकांच्या शिष्टमंडळाला दिली. यावेळी पंतप्रधान आवास योजना चऱ्होली या गृह प्रकल्पात असणाऱ्या १ हजार ५०० सदनिकाधारकांनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडल्याबद्दल फेडरेशनचे आभार व्यक्त केले आहेत.

> “पंतप्रधान आवास योजना चऱ्होली या योजनेमध्ये १ हजार ५०० सदनिकाधारक राहतात. या सदनिकाधारकांवर महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि करसंकलन विभागाने चुकीच्या पद्धतीने केलेली कर आकारणी रद्द करून सुधारित कर आकारणी करण्यात येईल असे आश्वासन कर संकलन आणि कर आकारणी विभागाचे प्रशासन अधिकारी नाना मोरे यांनी दिली. यामुळे सदनिकाधारकांना दिलासा मिळाला आहे.
>
> **–संजीवन सांगळे,** अध्यक्ष, चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन




**राज्य मंत्रिमंडळाने पुन्हा एकदा घेतला आहे. सुमारे आठ हजार कोटींचा तोटा असलेल्या एसटी मंडळाला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य शासनापुढे हात पसरावे लागतात एवढी गंभीर परिस्थिती या मंडळाची आहे. तोटा भरून काढण्याबरोबरच एसटी मंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता मंडळाच्या मालमत्तेचे खासगीकरण करून निधी जमा करण्याची गेली अनेक वर्षे योजना आहे.**

# व्यापारीकरणानंतर एसटीचे भले व्हावे!



एसटी मंडळाकडे ७५०च्या आसपास बस स्थानके आणि आगारांच्या जागा आहेत. व्यापारी तत्त्वावर एसटीच्या जागेचा विकास करण्याचा हा मंत्रिमंडळाने पहिल्यांदा घेतलेला निर्णय नाही. याची सुरुवात २००१ मध्ये झाली होती. पण गेल्या २३ वर्षात त्यात फारशी प्रगती झालेली दिसत नाही. २००६ मध्ये पुन्हा धोरणात काही बदल करण्यात आले. मध्यंतरी मंडळाच्या जागांचे चलनीकरण (मॉनेटायझेशन) करून निधी उभारण्याची योजना होती. पण याही प्रस्तावाची फारशी प्रगती झालेली दिसत नाही. २०१७ मध्ये तत्कालीन परिवहनमंत्री दिवाकर रावते यांनी सर्वाधिक वर्दळीच्या १३ आगारांचा खासगीकरणातून विकास करण्याचा निर्णय घेतला, त्याचाही प्रभाव दिसलेला नाही. उलट पनवेल आगाराच्या विकासाची योजना रखडली. २०१९च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मुंबई सेंट्रल येथील मंडळाच्या मुख्यालयाचा विकास करण्याच्या कामाचे भूमिपूजन पार पडले होते. ४९ मजली इमारत उभारण्यासाठी नियोजन करण्यात आले होते. विविध सरकारी कार्यालये या इमारतीत सुरू करण्याची योजना होती. पण गेल्या पाच वर्षांत बांधकामाची एक वीटही हलली नाही. पाच वर्षांनी पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर व्यापारीकरणाचा घाट घालण्यात आला आहे. गेल्या दोन दशकांत एसटीच्या ४५ जागांचा व्यापारी तत्त्वावर विकास करण्यात आला. त्यातून एसटी महामंडळास अधिमूल्य स्वरूपात फक्त ३२ कोटी रुपये मिळाले. २२ कोटी मूल्याचे बांधकाम करून मिळाले. खासगीकरणातून विकास झाला त्या स्थानकांची अवस्था फार काही चांगली नाही. अगदी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात खोपट आगाराचे काही वर्षांपूर्वी व्यापारीकरण करण्यात आले. ठेकेदाराने विक्रीसाठी अद्यायावत इमारत उभारली, पण एसटी स्थानकाच्या जागेची दुरवस्था कायम आहे. एसटी स्थानकांची देखभाल आणि दुरुस्ती होत नाही. परिणामी अनेक स्थानकांमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य आहे. निधीची चणचण या 'विकासा'नंतरही कायम असल्याने एसटी मंडळाचे हात बांधले गेलेले आहेत.व्यापारीकरणाचा नव्याने निर्णय घेताना काही अटी व शर्ती शिथिल करण्यात आल्या आहेत. भाडेपट्ट्याचा कालावधी ३० वर्षांवरून ६० वर्षे करण्याबरोबरच एसटी मंडळाच्या भूखंडावर उपलब्ध होणाऱ्या एकूण चटईक्षेत्र निर्देशांकापैकी ०.५ टक्के वगळता उर्वरित सर्व चटईक्षेत्र ठेकेदाराला उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जमिनीचा व्यापारी तत्त्वावर उपयोग करताना ५० टक्के हिस्सा शासनाकडे भरण्यापासून महामंडळास सवलत देण्यात येईल. सर्व निविदा महामंडळाच्या स्तरावरच अंतिम करण्यात येतील. यामुळे शासनाकडे होणारा फायलींचा प्रवास टळू शकेल. व्यापारीकरणात खासगी विकासकांनी भाग घ्यावा म्हणून अटी बदलल्यावर तरी व्यापारीकरणातून लाभ खरोखरच मिळतो का, हे आता बघायचे. व्यापारीकरणात खासगी विकासक स्वत:चा फायदा करून घेतात आणि शासनाला त्याचा फारसा लाभ मिळत नाही, हे अनेक विभागांमध्ये अनुभवास आले आहे. निविदा अंतिम करताना प्रवाशांच्या सोयीसुविधा तसेच आगारांमध्ये आमूलाग्र बदल होतील याची खबरदारी एसटी मंडळाला घ्यावी लागणार आहे. राज्यातील सामान्य जनतेची 'लाल परी' तोट्यातून बाहेर आणण्याचे खरे आव्हान आहे. एसटीच्या ताफ्यात नवीन बस गाड्यांची भर घालण्याबरोबरच कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देऊन सर्वसामान्यांची ही सेवा अधिक लोकाभिमुख करण्याच्या एसटीच्या अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांचे स्वागतच. खासगी सेवेशी स्पर्धा करणाऱ्या एसटीच्या सेवेचा जास्तीत जास्त लोकांना फायदा झाला पाहिजे.

## प्रासंगिक »

### बुल्स इन चायना

***तक्रारदाराने आरोपीस शिक्षा करण्याचा अधिकार स्वत:कडे घेणे आणि आवश्यक त्या किमान प्रक्रिया डावलून अशी 'शिक्षा' करणे म्हणजे एन्काउंटर. जे बदलापूरबाबत घडले.***

या अशा शिक्षा करण्याच्या अधिकाराचे राष्ट्रव्यापी, राष्ट्रवादी प्रारूप म्हणजे इस्रायल आणि या 'शिक्षेचा' ताजा आविष्कार म्हणजे त्या देशाने लेबनॉनवर लादलेले युद्ध. या दोन्हीमागील मानसिकता तीच. हे सत्य बदलापूरप्रकरणी स्वीकारणे काहींस जड जाईल. पण ती त्यांच्या असंस्कारित बुद्धीची मर्यादा असेल. या प्रकरणी पोलिसांस स्वसंरक्षणार्थ गोळीबार करावा लागला, असे सांगितले जाते. तो विनोदाचा अतिशयोक्ती अलंकार. त्यावर केवळ विचारशून्यांचाच विश्वास बसेल. या आरोपीने पोलिसांवर त्यांच्याच बंदुकीतून हल्ल्याचा प्रयत्न केला, हा दावा. तो किती हास्यास्पद आहे हे लक्षात घेण्यासाठी सदर परिस्थिती पाहा. पोलीस आणि हा आरोपी हे मोटारीत होते, अशात पोलिसांची बंदूक ओढून घेण्यासाठी आवश्यक ती जागा त्यास कशी मिळाली? हे शस्त्र ओढत असताना पोलीस हे ओढणे काय पाहत होते का?

सध्या विरोधकांना तुरुंगात डांबून राजकीय हेतू साध्य केले जात आहेत. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालय सातत्याने २१ व्या अनुच्छेदाची आठवण करून देते ही महत्त्वाची गोष्ट आहे. कारण जिथे निकषांच्या बाबतीत कायदा मूक आहे तिथे घटनात्मक तरतूद अतिशय बोलकी आणि स्पष्ट आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

# जामीन हा नियम, तुरुंगवास अपवाद!

गेल्या काही दिवसांत सर्वोच्च न्यायालयाने तपासयंत्रणांच्या बाबतीत जुनी विशेषणे नव्याने वापरली आहेत. १९७८ साली न्या. कृष्णा अय्यर यांनी राजस्थान सरकार विरुद्ध बालचंद प्रकरणात 'जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद' असायला हवा अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्याचाच पुनरुच्चार सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा कृत्ये प्रतिबंधक कायदा (यूएपीए) अंतर्गत जलालुद्दीन खान प्रकरणात पुन्हा एकदा केला आहे. अरविंद केजरीवाल यांना जामीन देताना पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाला पिंजऱ्यातील पोपटाप्रमाणे वागू नये अशी ताकीद दिली. याच स्वरूपाची टिप्पणी २०१३ साली सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्या. लोढा यांनी कोळसा घोटाळ्यात केली होती.विद्यामान सरन्यायाधीशांनी काही महिने अगोदरच कायद्याच्या चौकटीत जामीन देण्याबाबत कनिष्ठ आणि उच्च न्यायालयांकडून अपेक्षा व्यक्त



केली होती. दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना जामीन देताना सर्वोच्च न्यायालयाने या तत्त्वाची तपासयंत्रणांना आठवण करून दिली. मूलभूत अधिकार असलेल्या अनुच्छेद २१ अंतर्गत गुन्हा सिद्ध होत नाही तोवर जिथे जामीन देता येईल तिथे तो दिला जायलाच हवा असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. अगदी आर्थिक गुन्ह्यांसाठी कुप्रसिद्ध ठरत असलेल्या पीएमएलए कायद्यालासुद्धा हे तत्त्व लागू होते. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याशी संबंधित प्रेमप्रकाश यांचे प्रकरण असो अथवा दिल्ली मद्या घोटाळ्यातील आरोपी के. कविता यांचे प्रकरण असो. सातत्याने सर्वोच्च न्यायालयास 'जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद' याचा पुनरुच्चार करणे गरजेचे वाटले.संविधानात अनुच्छेद २१ जीवित व व्यक्तिस्वातंत्र्य या मूलभूत अधिकाराची तरतूद आहे. कायदेशीर कार्यपद्धतीव्यतिरिक्त नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे उल्लंघन होणार नाही याची हमी अनुच्छेद २१ प्रदान करतो. आरोपीच्या विरुद्ध खटल्याची जलद सुनावणीचाही यात समावेश आहे. याचाच अर्थ आरोपीला अमर्याद काळापर्यंत तुरुंगात डांबून ठेवणे घटनेला अभिप्रेत नाही. सध्याची एकंदर राजकीय परिस्थिती बघता विरोधकांना तुरुंगात टाकून राजकीय हेतू साध्य केले जात आहेत अशी मोठ्या प्रमाणात जनभावना आहे. न्या. भुयान यांनी अंमलबजावणी संचालनालयाने गेल्या दहा वर्षांत पीएमएलए कायद्यांतर्गत पाच हजार गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी केवळ ४० खटल्यांत गुन्हा सिद्ध झाल्याचे निर्दर्शनास आणले. कायद्याने आरोपीला अटक करण्याचे अधिकार दिले आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ब्रिजभूषण यांचे एन्काउंटर का केले नाही?

## शिंदे मृत्यू प्रकरणावरून वडेट्टीवारांचं पुन्हा शिंदेवर टीकास्त्र!

।मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बदलापूर शाळा लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला सोमवारी सायंकाळी पोलीस चकमकीत ठार करण्यात आले. अन्य एका प्रकरणाच्या तपासासाठी नेत असताना ही घटना घडली. या घटनेनंतर आता विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करण्यात येत आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी पुन्हा यावरून शिंदे सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. तसेच अक्षय शिंदेच्या मृत्यूवरून काही प्रश्नही उपस्थित केले.**



विजय वडेट्टीवार यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी या प्रकरणावरून शिंदे गट-भाजपा सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच हा जर न्याय असेल, तर महिला कुस्तीपटूंवर अत्याचार करणाऱ्या भाजपा खासदार ब्रिजभूषण सिंह यांचे एन्काऊंटर का नाही केले? त्यावेळी न्याय द्यायचा नव्हता का? असा प्रश्न त्यांनी सरकारला विचारला."बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला फाशीची शिक्षा व्हावी, अशी आमची मागणी होती. मात्र भाजपाने आरएसएसशी संबंधित लोकांना वाचविण्यासाठी शिंदेचा एन्काउंटर केला आहे. म्होरक्यांना वाचवण्यासाठी अक्षय शिंदेला एन्काऊंटरमध्ये ठार करण्यात आले. अक्षय शिंदे शाळेच्या ट्रस्टींचे कारनामे उघड करू शकला असता, त्याआधीच त्याला संपवण्यात आले", असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला."ज्या प्रकारे पोलिसांनी प्रेस नोट काढली त्यामधून उत्तरापेक्षा प्रश्नच अधिक निर्माण होतात. अक्षय शिंदेला तुरुंगातून नेतानाचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात त्याच्या चेहऱ्याला मास्क घातलेलं असून हाताला बेड्या लावल्या आहेत. तशाच अवस्थेत त्याला गाडीत बसवलं असेल तर मग त्यानं बेड्या लावलेल्या हातानं बंदूक कशी खेचली? त्याला वाहनातून नेताना त्याच्या डाव्या आणि उजव्या बाजूला पोलीस बसले होते का? ते बसले असतील तर आरोपीचा हात पोलिसांच्या बंदुकीजवळ कसा गेला? आरोपीनं बंदुकीचं लॉक कसं उघडलं? ज्या अधिकाऱ्यांच्या गोळ्यांनी तो जखमी झाला ती गोळी किती अंतरावरून झाडली गेली? असे एक नाही अनेक सवाल उपस्थित होत आहे ", असेही ते म्हणाले."पोलिसांनी काढलेली प्रेसनोट ही हास्यास्पद आहे. कारण पोलिसांनी प्रेस नोटमध्ये स्वसंरक्षणार्थ शब्द वापरला आहे. एकाच गोळीत त्याचा मृत्यू झाला. ती गोळी त्याला ताब्यात घेण्यासाठी चालवली होती, की त्याला मारण्यासाठी चालवली होती? कैद्याला ने-आण करण्याचं काम गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांचं नसतं. त्यांचं काम तपास करणं असतं. मग कैद्यांना ने-आण करण्यासाठी असे अधिकारी का नेमले? हे अधिकारी नेमण्यामागचा उद्देश काय होता?" असा प्रश्नही विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला."हाच जर न्याय असेल, तर महिला कुस्तीगीरवर अत्याचार करणाऱ्या भाजपा खासदार ब्रिजभूषण सिंहचे एन्काऊंटर का नाही केले? त्यावेळी न्याय द्यायचा नव्हता का? स्वतःच्या लोकांना वाचवण्यासाठी वाटेल तसा कायदा मोडायचा असा भाजपचा कारभार आहे", असी टीकाही त्यांनी केली.विजय वडेट्टीवार यांनी आज माध्यमांशी संवाद साधला.

"बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याला फाशीची शिक्षा व्हावी, अशी आमची मागणी होती. मात्र भाजपाने आरएसएसशी संबंधित लोकांना वाचविण्यासाठी शिंदेचा एन्काउंटर केला आहे. म्होरक्यांना वाचवण्यासाठी अक्षय शिंदेला एन्काऊंटरमध्ये ठार करण्यात आले.अक्षय शिंदेला तुरुंगातून नेतानाचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात त्याच्या चेहऱ्याला मास्क घातलेलं असून हाताला बेड्या लावल्या आहेत. तशाच अवस्थेत त्याला गाडीत बसवलं असेल तर मग त्यानं बेड्या लावलेल्या हातानं बंदूक कशी खेचली? त्याला वाहनातून नेताना त्याच्या डाव्या आणि उजव्या बाजूला पोलीस बसले होते का? ते बसले असतील तर आरोपीचा हात पोलिसांच्या बंदुकीजवळ कसा गेला? आरोपीनं बंदुकीचं लॉक कसं उघडलं? ज्या अधिकाऱ्यांच्या गोळ्यांनी तो जखमी झाला ती गोळी किती अंतरावरून झाडली गेली? असे एक नाही अनेक सवाल उपस्थित होत आहे ", असेही ते म्हणाले.

### आरोपीचा हात बंदुकीजवळ कसा गेला?

"पोलिसांनी काढलेली प्रेसनोट ही हास्यास्पद आहे. ती गोळी त्याला ताब्यात घेण्यासाठी चालवली होती, की त्याला मारण्यासाठी चालवली होती? कैद्याला ने-आण करण्याचं काम गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांचं नसतं. त्यांचं काम तपास करणं असतं. मग कैद्यांना ने-आण करण्यासाठी असे अधिकारी का नेमले? हे अधिकारी नेमण्यामागचा उद्देश काय होता?" असा प्रश्नही विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला."हाच जर न्याय असेल, तर महिला कुस्तीगीरवर अत्याचार करणाऱ्या भाजपा खासदार ब्रिजभूषण सिंहचे एन्काऊंटर का नाही केले?

# आज इतक्या वर्षांनी एक प्रॉडक्शन कंपनी सुरु केली

## राज ठाकरेंच्या हस्ते येक नंबर या चित्रपटाच्या ट्रेलर लाँच

।मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे त्यांच्या भाषणाच्या खास शैलीसाठी आणि त्यांच्या आक्रमक स्वभावासाठी ओळखले जातात. मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष स्थापन करण्याआधी शिवसेनेत होते. शिवसेनेत त्यांची कारकीर्द प्रदीर्घ राहिली. मात्र शिवसेनेतल्या अंतर्गत राजकारणाला ते कंटाळले आणि त्यांनी वेगळा निर्णय घेतला. '**

येक नंबर' या सिनेमाचा ट्रेलर लाँच सोहळा मुंबईत पार पडला. त्यावेळी राज ठाकरेंनी शिवसेनेतल्या राजकारणाला कंटाळल्यानंतर आपण काय करणार होतो तो किस्सा सांगितला आहे. ज्याची चर्चा घडते आहे."मी ट्रेलर लाँचसाठी आलेल्या माझ्या सगळ्या मित्रांचे आभार मानतो. खासकरुन आमिर खान यांचे आभार. मी त्यांना सांगितलं की 'येक नंबर' चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा आहे तुम्ही यायचं आहे. त्यावेळी कुठलेही आढेवेढे न घेता त्यांनी हो म्हटलं आणि ते उपस्थित झाले. माझे मित्र राजकुमार हिरानी, आशुतोष गोवारीकर यांचेही मी आभार मानतो. सिनेमाच्या स्टोरीत जेव्हा अडथळे आले




तेव्हा आशुतोष, राजकुमार यांनी आम्हाला प्रॉब्लेममधून मार्ग काढून दिला आहे." असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.राज ठाकरे म्हणाले, "साजिद खान यांचे आभार मानतो, त्याचप्रमाणे साजिद नाडियादवाला यांचेही आभार मानतो. मी २००० साली मी एका वेगळ्या पक्षात होतो. त्यावेळी त्या पक्षात जे काही राजकारण सुरु होतं त्याला मी वैतागलो होतो आणि खूप कंटाळलो होतो. त्यावेळी मी रिव्हर्स गिअर टाकला होता. मला ते राजकारण नकोच असं वाटत होतं. गोंधळ वगैरे काही करायचा नव्हता. मी हळूहळू राजकारण सोडून देईन कुठलाही धक्का वगैरे देणार नाही असं ठरवलं होतं. त्यावेळी मी साजिद नाडियादवाला आणि मी सतत भेटायचो.

### 24 वर्षांपूर्वीचा तो किस्सा काय?

आमच्यात अनेकदा चर्चा व्हायची. मी साजिद नाडियादवाला याला सांगितलं की मला सिनेमाची निर्मिती करायची आहे. एक दिवस मला साजिद यांनी सांगितलं की राजभाई मी प्रोड्युसर आहे. प्रोड्युसर कसं काम करतो मला माहीत आहे. राज ठाकरे प्रोड्युसर झाले तर त्यांना जे करावं लागेल ते मी पाहू शकणार नाही. त्यामुळे तुम्ही आहात तिथेच राहा. त्यामुळे मी राजकारणाकडे परत वळलो. मी राजकारणात पुन्हा येण्याचं कारण साजिद नाडियादवाला आहेत." असं राज ठाकरेंनी सांगताच उपस्थितांमध्ये प्रचंड हशा पिकला.

# काँग्रेसच्या डीएनएमध्येच आरक्षणविरोध!

## मोदींचे काँग्रेसवर आरक्षण विरोध या मुद्द्यांवरून टीकास्त्र

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या राज्यात प्रचारसभा घेत आहेत. सोनीपतमध्ये बुधवारी झालेल्या प्रचारसभेत नरेंद्र मोदींनी काँग्रेसला लक्ष्य केलं. काँग्रेसच्या १० वर्षांपूर्वीच्या कारभारावर टीका करताना मोदींनी भ्रष्टाचाराला काँग्रेसनंच जन्म दिल्याचा उल्लेख केला. तसेच, यावेळी त्यांनी काँग्रेसच्या डीएनएमध्येच आरक्षण विरोध असल्याचंही विधान केलं. पुढील महिन्यात ५ ऑक्टोबर रोजी हरियाणामध्ये एकाच टप्प्यात मतदान होत असून ८ ऑक्टोबरला हरियाणा व जम्मू-काश्मीरसाठीची मतमोजणी पार पडेल.**



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हरियाणातील सोनीपतमध्ये बोलताना काँग्रेसकडून भ्रष्टाचार केला जात असल्याचा आरोप केला. "आता जगभरातले लोक भारतात कंपनी उघडण्यासाठी येण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे तुम्हीच विचार करा, हरियाणात कसं सरकार असायला हवं? हरियाणात उद्योगांना प्रोत्साहन देणारं भाजपा सरकार गरजेचं आहे. नोकऱ्या वाढवणारं भाजपा सरकार गरजेचं आहे. तुम्हालाही माहिती आहे, जिथे कुठे काँग्रेसचं सरकार आलं, जिथे त्यांना संधी मिळाली, जिथे जिथे काँग्रेसनं पाऊल ठेवलं, तिथे एक गोष्ट नक्की झाली. भ्रष्टाचार आणि घराणेशाही", असं मोदी यावेळी म्हणाले."भारताच्या सरकारी व्यवस्थेत भ्रष्टाचाराला जन्म देणारी, भ्रष्टाचाराचं पालन-पोषण करणारी, आपल्या देशात भ्रष्टाचाराची कुणी जन्मदात्री असेल तर ती काँग्रेस पार्टी आहे. काँग्रेसचा शाही परिवार देशाचा सर्वात भ्रष्ट परिवार आहे. जिथे हाय कमांडच भ्रष्टाचारी असतं, तिथे खालच्या लोकांना लुटीचा खुला परवाना मिळतोच", असंही मोदी म्हणाले. दरम्यान, यावेळी काँग्रेसवर खोचक शब्दांत टीका करताना त्या पक्षानं हरियाणाला दलाल व जावयांच्या हाती सोपवलं, असं मोदी म्हणाले. "आठवून बघा, १० वर्षांपूर्वी जेव्हा इथे काँग्रेस सरकार होतं, तेव्हा काय व्हायचं? आज जे १८-२० वर्षांचे नवे मतदार आहेत, त्यांना तर माहितीही नसेल की १० वर्षांपूर्वी हरियाणातल्या शेतकऱ्यांना कसं लुटलं गेलं. तेव्हा शेतकऱ्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर लुटल्या गेल्या. काँग्रेसनं हरियाणाला दलाल व जावयांच्या हाती सोपवून दिलं होतं", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

कोणकोणत्या काँग्रेस नेत्यांवर आरोप झाले आहेत हे तुम्हाला चांगल्या प्रकारे ठाऊक आहे. हरियाणात एकही नोकरी अशी नव्हती जिथे पैशांचे व्यवहार होत नव्हते. सरकारी कंत्राटांमध्येही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत होता. हरियाणाला लुटून खाणाऱ्या भ्रष्ट काँग्रेसला सरकारपासून लांबच ठेवायचं आहे. तरच हरियाणा वाचेल", असा उल्लेख यावेळी नरेंद्र मोदींनी केला."काँग्रेसच्या शाही परिवारातून जो कुणी पंतप्रधान झाला, त्यानं आरक्षणाला विरोध केला. आरक्षणाला विरोध काँग्रेसच्या डीएनएमध्ये आहे. त्यामुळेच आजही काँग्रेसच्या शाही कुटुंबातली चौथी पिढीदेखील आरक्षणाला हटवण्याची चर्चा करते", अशी टीकाही त्यांनी केली. जिथे कुठे काँग्रेसचं सरकार आलं, जिथे त्यांना संधी मिळाली, जिथे काँग्रेसनं पाऊल ठेवलं, तिथे एक गोष्ट नक्की झाली. भ्रष्टाचार आणि घराणेशाही", असं मोदी यावेळी म्हणाले."भारताच्या सरकारी व्यवस्थेत भ्रष्टाचाराला जन्म देणारी, भ्रष्टाचाराचं पालन-पोषण करणारी, आपल्या देशात भ्रष्टाचाराची कुणी जन्मदात्री असेल तर ती काँग्रेस पार्टी आहे. काँग्रेसचा शाही परिवार देशाचा सर्वात भ्रष्ट परिवार आहे. जिथे हाय कमांडच भ्रष्टाचारी असतं, तिथे खालच्या लोकांना लुटीचा खुला परवाना मिळतोच", असंही मोदी म्हणाले."आठवून बघा, १० वर्षांपूर्वी जेव्हा इथे काँग्रेस सरकार होतं, तेव्हा काय व्हायचं? आज जे १८-२० वर्षांचे नवे मतदार आहेत, त्यांना तर माहितीही नसेल की १० वर्षांपूर्वी हरियाणातल्या शेतकऱ्यांना कसं लुटलं गेलं. तेव्हा शेतकऱ्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर लुटल्या गेल्या.

### काय म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी?

काँग्रेसनं हरियाणाला दलाल व जावयांच्या हाती सोपवून दिलं होतं", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.कोणकोणत्या काँग्रेस नेत्यांवर आरोप झाले आहेत हे तुम्हाला चांगल्या प्रकारे ठाऊक आहे. हरियाणात एकही नोकरी अशी नव्हती जिथे पैशांचे व्यवहार होत नव्हते. सरकारी कंत्राटांमध्येही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत होता. हरियाणाला लुटून खाणाऱ्या भ्रष्ट काँग्रेसला सरकारपासून लांबच ठेवायचं आहे. तरच हरियाणा वाचेल", असा उल्लेख यावेळी नरेंद्र मोदींनी केला."काँग्रेसच्या शाही परिवारातून जो कुणी पंतप्रधान झाला, त्यानं आरक्षणाला विरोध केला. आरक्षणाला विरोध काँग्रेसच्या डीएनएमध्ये आहे. त्यामुळेच आजही काँग्रेसच्या शाही कुटुंबातली चौथी पिढीदेखील आरक्षणाला हटवण्याची चर्चा करते", अशी टीकाही त्यांनी केली.

---

# कृष्ण जन्मभूमी-इदगाह प्रकरणी पुन्हा तारीख

## अलाहाबाद उच्च न्यायालयात जवळपास 18 याचिका दाखल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**श्रीकृष्ण जन्मभूमी वादासंदर्भातील याचिकेवरील पुढील सुनावणी आता ३० सप्टेंबर रोजी होणार आहे. याचिकाकर्त्यांतर्फे मुळ याचिकेत बदल करण्याची मागणी केल्याचे अलाहबाद उच्च न्यायालयाने ही सुनावणी पुढे ढकलली आहे. बुधवारी याप्रकरणी सुनावणी पार पडली. त्यावेळी न्यायमूर्ती मयंक कुमार जैन यांनी यासंदर्भात माहिती दिली.**



शाही ईदगाह मशीद ही कृष्ण जन्मभूमीवर उभारण्यात आली आहे, असा दावा हिंदू संघटनांनी केला आहे. यासंदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयात जवळपास १८ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या सर्व याचिका एकत्रित करून त्यावर सुनावणी होईल, असं न्यायालयाकडून आधीच स्पष्ट करण्यात आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे आज झालेल्या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी या प्रकरणाची सुनावणी रोज घेण्याची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली. याप्रकरणी रोज सुनावणी घेता येईल, अशी व्यवस्था सध्या उपलब्ध नाही. त्यामुळे ही मागणी मान्य करता येणार नाही, असं न्यायालयाने स्पष्ट केलं. दरम्यान, गेल्या १ ऑगस्ट रोजी या प्रकरणावर सुनावणी पार पडली होती. न्यायालयाने या याचिकांबाबत मुस्लीम पक्षकारांनी केलेले दावे फेटाळून लावले होते.

### बांधकाम हटवण्याचे निर्देश द्यावेत

शाही इदगाह मशीद समिती यांना जमिनीवर अतिक्रमण करून उभारण्यात आलेले बांधकाम हटवण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी केलेली आहे.श्रीकृष्ण जन्मभूमी ट्रस्टकडे सुपूर्द करण्याचा आदेश उत्तर प्रदेश सुन्नी सेंट्रल वक्फ बोर्ड, तसेच शाही इदगाह मशीद समिती या दोघांनाही द्यावा, करण्यात आलेली आहे. तसेच वक्फ बोर्ड व शाही इदगाह मशीद समिती, तसेच या दोन्ही संस्थांशी निगडित असलेल्या लोकांना मथुरा जिल्ह्यातील कटरा केशव देव शहरात असलेल्या १३.३७ एकर परिसरात प्रवेश करू देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

# हॅप्पी बर्थडे प्रियंका चोप्रा



ग्लोबल आयकॉन प्रियंका चोप्रा आज 41 वर्षांची झाली आहे. 18 जुलै 1982 रोजी जमशेदपूरमध्ये जन्मलेली प्रियंका ही एक सामान्य सावळ्या रंगाची मुलगी होती, तिला लहानपणापासूनच वर्णभेद आणि अश्लील टिप्पण्यांचा सामना करावा लागला होता. वयाच्या 13 व्या वर्षी तिला अमेरिकेत शिकण्यासाठी पाठवण्यात आले तेव्हा तिला रंगभेदाचा सामना करावा लागला. अमेरिकन मुलांमुळे त्रासलेली प्रियंका बाथरूममध्ये गुपचूप जेवण करायची. अमेरिकेत 3 वर्षे घालवल्यानंतर तिच्या वृत्तीत बदल झाला तेव्हा वडिलांनी तिला घराबाहेर पडण्यास आणि जीन्स घालण्यास बंदी घातली. पण टॅलेंट आणि पॅशनमुळे यश तिच्यापासून फार काळ दूर राहू शकले नाही. वयाच्या अवघ्या 18 व्या वर्षी प्रियांकाने मिस वर्ल्ड बनून एक आदर्श निर्माण केला, पण चित्रपटांमध्ये स्थान मिळवण्यासाठी तिला दिग्दर्शकाच्या चुकीच्या मागण्या आणि अश्लील कमेंट्सचा सामना करावा लागला. आज त्याच प्रियंका चोप्राची गणना बॉलिवूडच्या श्रीमंत अभिनेत्रींमध्ये केली जाते. प्रियंका 4 वर्षांची असताना तिचे वडील लेहमध्ये तैनात होते. लेहमध्ये प्रियंकाचे कुटुंब खोऱ्यात बांधलेल्या बंकरमध्ये राहत होते. इतर सैन्यातील लोकही तेथे राहत होते. लष्करात सेवा बजावत असताना प्रियंकाचे आई-वडील देशातील विविध शहरांमध्ये तैनात होते, त्यामुळे प्रियंकाचे बालपण दिल्ली, चंदीगड, अंबाला, लडाख, लखनौ, बरेली आणि पुणे येथे गेले.वयाच्या अवघ्या 13 व्या वर्षी प्रियंकाला शिक्षणासाठी अमेरिकेला पाठवण्यात आले. ती तिथे तिच्या मावशीकडे राहत होती. सावळ्या रंगामुळे लहानपणी प्रियंकाला शेरेबाजी करून मुले चिडवायची. तिला अनेक मुले भारतात परत जा म्हणून दबावही टाकायची. प्रियंकाला वैशिष्ट्यांबद्दल आणि त्वचेच्या रंगाबद्दल इतका अविश्वास वाटायचा की ती उत्तर देण्यास टाळाटाळ करायची. कोणी चेष्टा करू नये म्हणून प्रियंका इतर मुलांपासून घाबरून बाथरूममध्ये बसून जेवायची. प्रियंकाने तिच्या अनफिनिश्ड या आत्मचरित्रात तिच्या पहिल्या हार्टब्रेकशी संबंधित एक मजेदार किस्सा शेअर केला आहे. तिने लिहिले की, अमेरिकेत इयत्ता 9वीत शिकत असताना ती 10वीत शिकणाऱ्या बॉबच्या प्रेमात पडली होती. एक दिवस प्रियंकाची मावशी किरण घराबाहेर गेली होती. संधीचा फायदा घेत 13 वर्षीय प्रियंकाने बॉबला घरी बोलावले. प्रियंका-बॉब किस करणारच होते की अचानक काकू परतल्या. प्रियंकाने ताबडतोब बॉबला वॉर्डरोबमध्ये लपवले, पण ती पकडली गेली. घरात तिला बोलणे ऐकावे लागले आणि बॉब तिला सोडून गेला. बॉबने काही दिवसांनंतर प्रियंकाच्या मैत्रिणीला डेट करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे तिचे मन दुखावले.प्रियंका चोप्रा वयाच्या 17 व्या वर्षी अमेरिकेतून भारतात आली तेव्हा तिच्या जीवनशैलीत पेठा बदल झाला.

# दीपिका वॉरियर



प्रभासचा 'प्रोजेक्ट के' हा चित्रपट पुढच्या वर्षी रिलीज होणार आहे. चित्रपटाचा टीझर 20 जुलै रोजी अमेरिकेतील सॅन डिएगो कॉमिक-कॉन इव्हेंटमध्ये प्रदर्शित होणार आहे. भारतात एका दिवसानंतर 21 जुलै रोजी टीझर रिलीज होईल. निर्मात्यांनी चित्रपटातील दीपिका पदुकोणचा फर्स्ट लूक आधीच शेअर केला आहे. तो रिलीज झाल्यापासून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. फर्स्ट लूकमध्ये दीपिका खूपच सुंदर दिसत आहे. पोस्टरमध्ये ती रस्टीक आणि इंटेन्स लूकमध्ये दिसत आहे. तिचा तपकिरी-राखाडी पोशाख वॉर सूटची आठवण करून देतो आणि तिचे डोळेही इंटेन्स दिसत आहेत. दीपिकाचा नो-मेकअप लूक सोशल मीडियावर चांगलाच पसंत केला जात आहे. अभिनेत्रीचा लूक पाहिल्यानंतर ती दमदार ॲक्शन करताना दिसणार असल्याचे निश्चित झाले आहे. चित्रपटात ती वॉरियरच्या भूमिकेत दिसणार आहे. या सायन्स फिक्शन चित्रपटाच्या स्टार कास्टमध्ये दीपिकासह कमल हसन, अमिताभ बच्चन, प्रभास अशी मोठी नावे आहेत. कमल हसन खलनायकाच्या भूमिकेत असणार आहेत. दिशा पाटणीही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

# आलियाची माधुरीसोबत तुलना



आलिया भट्ट सध्या तिच्या आगामी रॉकी और रानी या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. अलीकडेच, अभिनेत्री चित्रपटाच्या प्रमोशनसाठी दिल्लीला पोहोचली, जिथे ती एका मल्टिकलर साडीत दिसली, ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये आलिया खूपच सुंदर दिसत आहे. व्हिडिओमध्ये आलिया बहुरंगी साडीत दिसत आहे. तिने ही साडी ब्लू व्ही शेप नेकलाइन ब्लाउजसोबत कॅरी केली आहे. कमीत कमी मेकअप, बहुरंगी एअरिंग आणि मोकळे केस यामध्ये आलिया खूप क्लासी दिसते. यादरम्यान तिने हसत हसत पापाराझींना पोजही दिली. चाहत्यांना तिचा हा सुंदर लूक आवडला आणि त्यांनी व्हिडिओवर कमेंट्सचा वर्षाव केला.

कमेंट करताना एका यूजरने तिची तुलना बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षितशी केली. दुसऱ्यावर कमेंट करताना लिहिले की, 'तू खूप सुंदर आहेस आलिया भट्ट'. तिसऱ्याने लिहिले, 'माझी आवडती अभिनेत्री'. त्याचवेळी दुसऱ्या युजरने लिहिले की, 'बाळाला जन्म दिल्यानंतर ती आणखी सुंदर झाली आहे'. रणवीर सिंग आणि आलिया भट्ट स्टारर चित्रपट 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' 28 जुलै रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे. करण जोहर दिग्दर्शित या चित्रपटात शबाना आझमी, धर्मेंद्र आणि जया बच्चन यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार आहेत. या चित्रपटात रणवीर आणि आलियाची जबरदस्त रोमँटिक केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे. बॉलिवूडसोबतच आलिया भट्टचा हॉलिवूडमध्येही दबदबा आहे. अभिनेत्री लवकरच गल गडोतच्या हार्ट ऑफ स्टोनमधून हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला होता, ज्याला चाहत्यांनी चांगला प्रतिसाद दिला होता.

# तापसीचा टोमणा

तापसी पन्नू ही स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध असलेल्या बॉलिवूड अभिनेत्रींपैकी एक आहे. अलिकडेच तापसीने सोशल मीडियावर चाहत्यांशी संवाद साधला होता. या संवादादरम्यान तापसीने चाहत्यांच्या प्रश्नांना अनेक मजेशीर, उत्तरे दिली. एका चाहत्याला उत्तर देताना तिने, बॉलिवूडच्या अनेक अभिनेत्रींना टोला लगावला. चर्चेदरम्यान चाहत्याने तापसीला विचारले की, ती लग्न कधी करणार आहे? यावर अभिनेत्रीने उत्तर दिले, 'मी लग्न कधी करणार आहे? मी अजून गरोदर नाही. त्यामुळे लवकर तर नाही. केल्यावर मी सर्वांना सांगेन. हे उत्तर दिल्यानंतर तापसी काही वेळ हसतानाही दिसली. तापसीने लग्नाआधी गर्भवती असलेल्या बॉलिवूड अभिनेत्रींची खिल्ली उडवली असे आता म्हटले जात आहे. चाहत्यांशी संवाद साधताना तापसी असेही म्हणाली की, सध्या ती काम करण्यापेक्षा सुट्टीचा आनंद घेत आहे. अभिनेत्रीने सांगितले की, तिच्या पुढील सहलीसाठी ती थायलंडमधील क्राबी बेटावर जाणार आहे. तापसी गेल्या काही वर्षांपासून बॅडमिंटनपटू-प्रशिक्षक मॅथियास बोईसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. चित्रपटांच्या शूटिंगमधून मोकळी असते, तेव्हा ती बहीण शगुन पन्नू आणि प्रियकरासोबत सुट्टीचा आनंद लुटताना दिसते. काही वर्षांपूर्वी पिंकविलाला दिलेल्या मुलाखतीत तापसीने ती फक्त मुलांसाठीच लग्न करणार असल्याचे सांगितले होते. तापसी म्हणाली होती, 'मला मुले हवी असतील तेव्हाच मी लग्न करेन. लग्नानंतरच मुले हवी आहेत. मला माझा विवाह सोहळा खाजगी आणि लहान ठेवायचा आहे, असे ती म्हणाली होती. तापसीचा आगामी चित्रपट डंकी आहे. त्यात ती शाहरुख खानबरोबर झळकणार आहे. राजकुमार हिरानी या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत.

# अनन्या-आदित्य पुन्हा सोबत



अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर यांच्या नात्याची सध्या जोरात चर्चा सुरू आहे. त्याचवेळी, गेल्या काही दिवसांपासून रुमर्ड कपल स्पेन आणि पोर्तुगालमध्ये एकत्र व्हेकेशन साजरे करत आहे. सोशल मीडियावर दोघांचे काही नवीन फोटो समोर आले आहेत. या फोटोंमध्ये दोघेही एकमेकांसोबत वेळ घालवताना दिसत आहेत. हा फोटो पोर्तुगीज शहर लिस्बनचा आहे, ज्यामध्ये दोघेही रेस्टॉरंटमध्ये बसलेले दिसत आहेत. यादरम्यान दोघेही ड्रिंक्सचा आनंद लुटताना दिसत आहेत. लोकप्रिय फोटोंमध्ये, अनन्या एका स्वेटरमध्ये दिसत आहे, जो तिने पांढऱ्या टी-शर्टसह स्टाईल केला आहे. अभिनेत्री तिच्यासोबत बॅकपॅकही घेऊन जात आहे. दुसरीकडे, नाईट मॅनेजर अभिनेता कॅज्युअल नेव्ही ब्लू लिनन शर्टमध्ये दिसत आहे. सोशल मीडियावर फोटो समोर आल्यापासून हे जोडपे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. मात्र, आतापर्यंत दोघांनीही त्यांच्या नात्याबद्दल काहीही सांगितले नाही.याआधी बुधवारी आदित्य-अनन्याच्या व्हेकेशनचे फोटो व्हायरल झाले होते. यादरम्यान, हे जोडपे बुधवारी पोर्तुगालच्या लिस्बन शहरात एकत्र वेळ घालवताना दिसले. दुसरीकडे, याच्या एक दिवस आधी, कपलने मंगळवारी आर्क्टिक मंकीच्या म्युझिक कॉन्सर्टचे व्हिडिओ देखील शेअर केले. पापाराझी मानव मिगलानीने बुधवारी त्याच्या इंस्टाग्राम हँडलवर जोडप्याचे फोटो शेअर केले. या फोटोंमध्ये अनन्या आणि आदित्य दोघेही कॅज्युअल आउटफिटमध्ये दिसत होते.गेल्या वर्षी क्रिती सेननच्या दिवाळी पार्टीत एकत्र दिसल्यानंतर आदित्य आणि अनन्याच्या डेटिंगच्या अफवा पसरू लागल्या होत्या.

# तिने देशाची माफी मागायला हवी!

## कुस्तीपटू विनेश फोगटबद्दल योगेश्वर दत्तचे मोठे वक्तव्य

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतीय कुस्तीपटू विनेश फोगट अंतिम फेरीत पोहोचली आणि पदक निश्चित झाले. मात्र, अंतिम फेरीपूर्वी १०० ग्रॅम जास्त वजनामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले. विनेश भारतात परतल्यावर विमानतळावर तिचे जंगी स्वागत झाले. विनेशने आता राजकारणात प्रवेश केला आहे. आता तिची बहीण बबिता फोगट आणि ऑलिम्पिक पदक विजेता योगेश्वर दत्तने विनेशवर निशाणा साधला आहे. योगेश्वर दत्त म्हणाला की, विनेशने पॅरिसहून परत येऊन देशाची माफी मागायला हवी होती. तर बबिताने विनेशला अपात्र होण्यासाठी जबाबदार धरले आहे.**



'आज तक'शी बोलताना योगेश्वर दत्तने सांगितले की, विनेश फोगटचे पॅरिसहून परतल्यानंतर विमानतळावर केलेले स्वागत चुकीचे होते. तो म्हणाला, “ऑलिम्पिकमधील अपात्रतेबद्दल बोलूया. सर्वप्रथम, जेव्हा एखादा खेळाडू अपात्र ठरतो तेव्हा त्याने देशाची माफी मागितली पाहिजे की त्याने चूक केली आणि माझ्यामुळे देशाला पदक गमवावे लागले. यासाठी तिने पंतप्रधानांवर आरोप केले. या घटनेला षडयंत्र म्हटले.”योगेश्वर दत्त पुढे म्हणाला, “प्रत्येकाला माहित आहे की खेळाडू एक ग्रॅम कमी असो, ५० ग्रॅम जास्त किंवा १०० ग्रॅम जास्त असला तरी तो अपात्र ठरतो. याबाबत चुकीचे वातावरण निर्माण केले. तिच्या अपात्रतेनंतर विनेशचे काहीतरी चुकले, असे वातावरण देशभर निर्माण केले. तिच्या जागी मी असतो, तर मी माफी मागितली असती की, मी माझे वजन नियंत्रणात आणू शकलो नाही, माझ्यामुळे देशाला पदक गमवावे लागले. इथे तर तिचे स्वागत होत आहे, देश पंतप्रधानांना शिव्या देत आहे. चुकांचे स्वागत करण्याची प्रथा सुरू झाली आहे जी चुकीची आहे.”बबिताने तिची चुलत बहीण विनेश फोगटला अपात्रतेसाठी जबाबदार धरले. ती म्हणाली, “मी स्वत: २०१२ मध्ये अपात्र ठरली होती. मला भारतातही अपात्रतेची शिक्षा झाली. त्या वर्षी मी ऑलिम्पिक चाचण्याही खेळू शकलो नाही. ध्ये भारतीय कुस्तीपटू विनेश फोगट अंतिम फेरीत पोहोचली आणि पदक निश्चित झाले. मात्र, अंतिम फेरीपूर्वी १०० ग्रॅम जास्त वजनामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले. विनेश भारतात परतल्यावर विमानतळावर तिचे जंगी स्वागत झाले. विनेशने आता राजकारणात प्रवेश केला आहे. आता तिची बहीण बबिता फोगट आणि ऑलिम्पिक पदक विजेता योगेश्वर दत्तने विनेशवर निशाणा साधला आहे. कारण ती माझी चूक आहे, हे मला माहीत होतं. मला २०० ग्रॅमच्या फरकामुळे अपात्र ठरवण्यात आले होते. ही जबाबदारी खेळाडूची असते, कारण खेळाडूला वजन मोजण्याच्या मशीनवर उभे राहावे लागते. तिथे प्रशिक्षक किंवा कोणताही सपोर्टिंग स्टाफ तिथे उभा राहत नाही. कोचिंग स्टाफने प्रयत्न करतात पण शेवटी आमचीच चूक असते.”'आज तक'शी बोलताना योगेश्वर दत्तने सांगितले की, विनेश फोगटचे पॅरिसहून परतल्यानंतर विमानतळावर केलेले स्वागत चुकीचे होते. तो म्हणाला, “ऑलिम्पिकमधील अपात्रतेबद्दल बोलूया. सर्वप्रथम, जेव्हा एखादा खेळाडू अपात्र ठरतो तेव्हा त्याने देशाची माफी मागितली पाहिजे की त्याने चूक केली आणि माझ्यामुळे देशाला पदक गमवावे लागले. यासाठी तिने पंतप्रधानांवर आरोप केले. मात्र, अंतिम फेरीपूर्वी १०० ग्रॅम जास्त वजनामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले. विनेश भारतात परतल्यावर विमानतळावर तिचे जंगी स्वागत झाले.या घटनेला षडयंत्र म्हटले.”योगेश्वर दत्त पुढे म्हणाला, “प्रत्येकाला माहित आहे की खेळाडू एक ग्रॅम कमी असो, ५० ग्रॅम जास्त किंवा १०० ग्रॅम जास्त असला तरी तो अपात्र ठरतो. याबाबत चुकीचे वातावरण निर्माण केले. तिच्या अपात्रतेनंतर विनेशचे काहीतरी चुकले, असे वातावरण देशभर निर्माण केले. तिच्या जागी मी असतो, तर मी माफी मागितली असती की, मी माझे वजन नियंत्रणात आणू शकलो नाही, माझ्यामुळे देशाला पदक गमवावे लागले. इथे तर तिचे स्वागत होत आहे, देश पंतप्रधानांना शिव्या देत आहे. चुकांचे स्वागत करण्याची प्रथा सुरू झाली आहे जी चुकीची आहे.”बबिताने तिची चुलत बहीण विनेश फोगटला अपात्रतेसाठी जबाबदार धरले. ती म्हणाली, विनेशने आता राजकारणात प्रवेश केला आहे. आता तिची बहीण बबिता फोगट आणि ऑलिम्पिक पदक विजेता योगेश्वर दत्तने विनेशवर निशाणा साधला आहे. योगेश्वर दत्त म्हणाला की, विनेशने पॅरिसहून परत येऊन देशाची माफी मागायला हवी होती.

### ही जबाबदारी खेळाडूची असते

आता तिची बहीण बबिता फोगट आणि ऑलिम्पिक पदक विजेता योगेश्वर दत्तने विनेशवर निशाणा साधला आहे. कारण ती माझी चूक आहे, हे मला माहीत होतं. मला २०० ग्रॅमच्या फरकामुळे अपात्र ठरवण्यात आले होते. ही जबाबदारी खेळाडूची असते, कारण खेळाडूला वजन मोजण्याच्या मशीनवर उभे राहावे लागते. तिथे प्रशिक्षक किंवा कोणताही सपोर्टिंग स्टाफ तिथे उभा राहत नाही. कोचिंग स्टाफने प्रयत्न करतात पण शेवटी आमचीच चूक असते. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतीय कुस्तीपटू विनेश फोगट अंतिम फेरीत पोहोचली आणि पदक निश्चित झाले.

---

# खराब कामगिरीचा विराट-रोहितला मोठा फटका

## यशस्वी टॉप-5 मध्ये दाखल तर ऋषभचे दमदार पुनरागमन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा सामना २७ सप्टेंबरपासून कानपूर येथे खेळवला जाणार आहे. टीम इंडियाने मालिकेतील पहिला सामना २८० धावांनी जिंकला होता. या सामन्यात रोहित शर्मा किंवा विराट कोहली दोघांनीही फलंदाजी केली नाही. आता या दोघांना आयसीसी कसोटी क्रमवारीतही याचे परिणाम भोगावे लागले आहेत.**




एकीकडे विराट कोहली टॉप १० मधून बाहेर पडला आहे, तर रोहित शर्मा दहाव्या स्थानावर घसरला आहे. मात्र, भारताचा इतर फलंदाजांना क्रमवारीत फायदा झाला आहे.आयसीसी कसोटी क्रमवारीत टॉप-४ मध्ये कोणताही बदल झालेला नाही. इंग्लंडचा जो रूट अजूनही पहिल्या क्रमांकावर कायम आहे. त्याचे रेटिंग सध्या ८९९ आहे. न्यूझीलंडचा केन विल्यमसन दुसऱ्या स्थानावर आहे. त्याचे रेटिंग ८५२ आहे. न्यूझीलंडचा डॅरिल मिशेल ७६० रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर कायम आहे. स्टीव्ह स्मिथने ७५७ रेटिंगसह चौथे स्थानावर कायम आहे.या क्रमवारीत टॉप-४ नंतर भारताची यशस्वी जैस्वाल आता एका स्थानाने पुढे सरकत पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग ७५१ पॉइंट झाले आहेत. बांगलादेशविरुद्धच्या कसोटीच्या पहिल्या डावात त्याने अर्धशतक झळकावले, त्याचा फायदा त्याला झाला आहे. उस्मान ख्वाजालाही एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता ७२८ रेटिंगसह ७व्या क्रमांकावर आहे. पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवानलाही एका स्थानाचा फायदा झाला आहे.

### रिझवानलाही झाला फायदा

तो आता ७२० च्या रेटिंग पॉइंटसह आठव्या क्रमांकावर पोहोचला आहे. मार्नस लॅबुशेन देखील आठव्या क्रमांकावर संयुक्त आहे, कारण त्याचेही रेटिंग पॉइंट ७२० आहेत.भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माला एका झटक्यात ५ स्थानांचे नुकसान झाले आहे. त्याचे रेटिंग पॉइंट आता ७१६ पर्यंत घसरले असून तो थेट दहाव्या स्थानावर घसरला आहे. त्याचबरोबर विराट कोहलीलाही तेवढ्याचा स्थानांचा फटका बसला आहे.